# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर  वर्ष ४ थे  अंक २५५ वा  शनिवार दि.०५ एप्रिल २०२५  पृष्ठे ४  स्वागत मूल्य २ रू.


## अजित पवार सत्तेसाठी लाचार झालेत

मुंबई : भारतीय जनता पक्षाला पाठिंबा देत सरकारमध्ये सहभागी झालो तरी शिव, शाहु, फुले, आंबेडकरांच्या विचाराचा वारसा सोडला नाही असे सांगणा-या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा खरा चेहरा उघडा पडला आहे. भाजप सरकारने आणलेल्या वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा दिल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार सत्तेसाठी लाचार झाले असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.



लोकसभेने वक्फ दुरुस्ती विधेयकावर बुधवारी मध्यरात्री २ च्या ठोक्याला आपली मोहोर उमटवली. त्यानंतर दुस-या दिवशी हे विधेयक संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मांडण्यात आले. या सभागृहाने गुरुवारी मध्यरात्री २ च्या सुमारास हे विधेयक हातावेगळे केले. आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाईल. त्यांची त्यांच्यावर स्वाक्षरी झाली की या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल. या विधेयकाला अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा दिला आहे. यावरून हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे.

अजित पवारांनी चुलत्याचा पक्ष चोरला

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अजित पवार यांनी काका शरद पवार यांचा पक्ष भाजपच्या मदतीने चोरून पक्षाचे नाव व चिन्हही घेतले व सत्तेसाठी धर्मांध शक्तीच्या बाजूला जाऊन बसले. तेव्हापासून ते सातत्याने आपण विकासासाठी सत्तेत सहभागी झालो असलो तरी, पुरोगामी विचार सोडला नाही असे बिंबवण्याचा प्रयत्न ते करत आहेत. त्यांनी एका इफ्तार पार्टीत सहभागी होत मुस्लिम समाजाला त्रास देणा-यांना सोडणार नाही, माफ केले जाणार नाही, अशा वल्गना केल्या. मुस्लिम समाजाच्या पाठीमागे आहे

## दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या मनमानीमुळे महिलेचा मृत्यू, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतला मोठा निर्णय

पुणे – पुण्यातील प्रतिष्ठित दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर गंभीर आरोपांचा भडिमार झाला आहे. प्रसूतीसाठी दाखल झालेल्या तनिषा सुशांत भिसे या गर्भवती महिलेच्या कुटुंबाकडून रुग्णालयाने १० लाख रुपयांची मागणी केल्याचा दावा करण्यात आला आहे. कुटुंबीयांनी काही पैसे जमा करण्याची तयारी दर्शवली, तरीही रुग्णालयाने तनिषाला दाखल करून घेण्यास नकार दिला. परिणामी, वेळेवर उपचार न मिळाल्याने तिचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे. या घटनेने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. रुग्णालयाबाहेर आंदोलने सुरू झाली असून, प्रशासनावर कठोर कारवाईची





मागणी जोर धरत आहे.

या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रथमच आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ते म्हणाले, ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि असंवेदनशीलतेचे प्रतीक आहे. दीनानाथ मंगेशकर हे नावाजलेले रुग्णालय आहे. स्वतः लता दीदी आणि मंगेशकर कुटुंबाने हे रुग्णालय उभे केले आहे. पण येथील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी प्रसूतीसाठी आलेल्या महिलेला दाखल करण्यास नकार देत किंवा जादा पैसे मागून असंवेदनशीलता दाखवली. ही बाब अत्यंत गंभीर आहे.

फडणवीस पुढे म्हणाले, या घटनेनंतर लोकांमध्ये प्रचंड रोष आहे. धर्मादाय रुग्णालयांनी तरी आपली जबाबदारी योग्यपणे पार पाडावी, अशी सर्वांची अपेक्षा आहे. त्यामुळे मी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. ही समिती या प्रकरणाची सखोल चौकशी करेलच, शिवाय भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी धर्मादाय रुग्णालयांवर नियंत्रण कसे ठेवता येईल, यावरही लक्ष केंद्रित करेल. मेडिकल इथिक्सचे पालन होणे आवश्यक आहे.

## व्हिएतनाम, हनोई येथील आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेत बीडच्या योगतज्ज्ञ राधा घोलप (तांबे) यांना दोन सुवर्णपदके

केज/प्रतिनिधी नुकतीच हनोई, व्हिएतनाम येथे वर्ल्ड योगा स्पोर्ट्स फेडरेशनतर्फे दहावी आंतरराष्ट्रीय योग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत जगभरातील नामांकित योगपटूंनी विविध वयोगटांत सहभाग घेतला. बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध योगतज्ज्ञ श्रीमती राधा घोलप (तांबे) यांची या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. योग क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या श्रीमती राधा तांबे यांनी आपल्या उत्कृष्ट योग सादरीकरणाच्या जोरावर दोन सुवर्णपदके जिंकून देशाचे नाव जागतिक स्तरावर उंचावले. त्यांनी रीदमिक आणि ट्रेडिशनल अशा दोन्ही प्रकारांत सुवर्णपदके मिळवत पुन्हा एकदा आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. बीड जिल्ह्याची ख्याती जागतिक स्तरावर पोहोचवण्याचे श्रेय श्रीमती तांबे यांच्या मेहनतीला जाते. अनेक संघर्षांचा सामना करत, कोणत्याही आर्थिक पाठबळाशिवाय, त्यांनी स्वतः च्या जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले. आतापर्यंत त्यांनी थायलंड, नेपाळ आणि आता व्हिएतनाम-अशा तीन आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदके पटकावली आहेत. नेव्हर गिव्ह अप हा त्यांचा दृष्टिकोन, अविरत मेहनत करण्याची तयारी, चिकाटी आणि जिद्द यामुळे त्या सतत नवे शिखर गाठत आहेत. आज त्या असंख्य महिलांसाठी प्रेरणास्त्रोत बनल्या आहेत. जहाँ चाह होती है, वहाँ राह भी



मिलती है या वचनाची प्रचिती त्यांच्या जीवनसंघर्षाकडे पाहिल्यावर येते. महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या या कर्तृत्ववान महिलेसाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. आपल्या परिश्रमाने आणि आत्मबळावर परदेशात भारताचे नाव उज्ज्वल करणाऱ्या या वीरांगनेचे संपूर्ण जिल्ह्यात, तसेच विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

## जुना रेणापूर नाका ते बालाजी मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम नागरीकांच्या तक्रारीची माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी घेतली दखल



लातूर / प्रतिनिधी :– लातूर शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील जुना रेणापूर नाका ते बालाजी मंदिर परिसरातील तुंबलेल्या नाल्यांमुळे रस्त्यावर साचलेल्या अस्वच्छ पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. तसेच रस्त्यावरील खड्डे आणि बाजूची झाडी यामुळे नागरिकांना अडचणी येत होत्या. या समस्येची तक्रार डॉ. पवन लड्डा यांनी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्याकडे केली. आमदार अमित देशमुख यांनी या तक्रारीची तातडीने दखल घेत मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांना या परिसरात स्वच्छता मोहीम राबवून रस्ता खुला करण्याचे निर्देश दिले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या परिसरातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी विष्णुदास धायगुडे आणि डॉ. पवन लड्डा यांना पाहणी करण्यास सांगितले. त्यानंतर मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांना या परिसरातील स्वच्छतेसह मोहीम राबवून रस्ता खुला करण्याचे, सर्व असुविधा दूर करून नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचेही सांगितले. मनपाची स्वच्छता मोहीम: लातूर मनपा स्वच्छता निरीक्षक हीरानारायण कांबळे आणि त्यांच्या स्वच्छता पथकाने साफसफाईचे काम सुरू केले आहे. बालाजी मंदिर परिसरात काही ठिकाणी नाली बांधकामात तांत्रिक दोष आढळल्यामुळे पाणी प्रवाहामध्ये अडथळा निर्माण होत होता. यासाठी मनपा शहर अभियंत्यांना परिसरातील नाले आणि रस्त्यांची दुरुस्ती करण्यास सांगितले आहे. नवीन बसस्थानक परिसरात पथदिवे लावण्यात बाबत येणार आहेत, जुना रेणापूर नाका चौकातील रस्त्यावरील खड्डा बुजवण्यात आला आहे. जुना रेणापूर नाका ते बालाजी मंदिर रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाढलेली झुडपे तोडण्याचे काम केले जाणार आहे. साफसफाई करून खड्डा बुजवल्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करून आमदार अमित देशमुख यांचे आभार मानले आहेत.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त लातुरात विविध कार्यक्रमाचे आयोजन,शनिवारी चक्रवर्ती सम्राट अशोक जयंतीनिमित्त मिरवणूक – अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे

लातूर :– विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने लातूर शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून शनिवारी चक्रवर्ती सम्राट अशोक जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम व भव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे यांनी दिली आहे.

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती लातूर शहरांमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत असून जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ५ एप्रिल रोजी सम्राट अशोक जयंती निमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने अभिवादन करून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. तर १० एप्रिल रोजी १८ तास अभ्यास स्पर्धा घेण्यात येणार आहेत. ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने अभिवादन करण्यात येणार आहे. १३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता भव्य समता रॅलीचे आयोजन व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त १३४ वृक्षाचे



लातूर शहरात रोपण करण्यात येऊन रात्री १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क नावाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे एलईडी बोर्डाचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. १३४ व्या जयंतीनिमित्त १३४ तोफांची सलामी देण्यात येणार आहे. तसेच १४ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित केला असून सकाळी ९.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे ध्वजारोहण करण्यात येणार आहे. दरम्यान दिवसभर गांधी चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने जयंती मंडळाच्या मान्यवरांचे स्वागत करण्यात येणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे बुद्ध व भीम गीतांचा भव्य असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.अशी माहिती हीं डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे यांनी दिली आहे.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२४ जयंती उत्साहात साजरी करण्यासाठी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार महादेव चिकटे,कोषाध्यक्ष–बाबा कांबळे,सचिव–राहुल कांबळे,कार्याध्यक्ष–ड.रमक जोगदंड,स्वागत अध्यक्ष–मा.खासदार.डॉ.सुनील बळीराम गायकवाड उपाध्यक्ष–अमोल शिंदे,चिंटू गायकवाड.सहकोषाध्यक्ष–बालाजी कांबळे.सहसचिव–विजय चौधरी,रवी कांबळे,संघटक–विनय जाकते,आकाश सरवदे,सांस्कृतिक प्रमुख– रामभाऊ कोरडे,वैभव गायकवाड,रितेश गायकवाड पदाधिकारी प्रयत्न करत आहेत.

## साबदे, कुटुंबाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून सांत्वन

लातूर :– कोंग्रेसचे ज्येष्ठ नेते जेष्ठ वकील अँड भारत साबदे यांचे काही दिवसापूर्वी नुकतेच निधन झाले त्याबद्दल शुक्रवारी त्यांच्या विशाल नगर निवासस्थानी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले दिवंगत भारत साबदे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले कुटुंबातील सदस्य चंद्रकला साबदे, ललिता साबदे राघवेंद्र साबदे श्रीनिवास साबदे उपस्थित होते



याप्रसंगी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, प्रताप पडिले, चंद्रशेखर दंडीमे, सतीश पाटील उपस्थित होते

## लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांच्या हस्ते मयत सभासदांच्या वारसांना जनता अपघात विमा रक्कमेचे वितरण.

लातूर :––आपल्या क ा य ा ॅ त ू न नावलौकिक प्राप्त केलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेती सहकारी संस्था अंतर्गत कर्जदार सभासदांना विम्याचे संरक्षण मिळावे या हेतूने जनता अपघात विमा योजना स्विकारलेली असून या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणात शेतकरी सभासदांना झालेला आहे. योजनेअंतर्गत




५८६ प्राथमिक शेती सहकारी संस्थांचे २३८६२१ सभासदांचा बँकेने जनता अपघात विमा उत्तरविला असून आजपावेतो जिल्ह्यातील एकूण १३४३ मयत शेतकरी सभासदांच्या वारसांना रु.१९ कोटी ३० लाख इतकी नुकसान भरपाई रक्कम प्राप्त झालेली आहे.

दि.०४.०४.२०२५ रोजी या योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू झालेल्या १० सभासदांच्या वारसांना प्रत्येकी रु.५.०० लाख प्रमाणे एकूण रु.५०.०० लाख रुपयांचे धनादेशाव्दारे वितरण बँकेचे चेअरमन मा. आ. धिरज विलासरावजी देशमुख यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. प्रमोद जाधव तथा संचालक अनुप शेळके उपस्थित होते.

## संपादकीय....

# थकबाकीचे 'जड ओझे'

गेल्या काही वर्षांत क्रेडिट कार्डवर व्यवहार करणार्यांची संख्या झपाट्याने वाढत चालली आहे. परिणामी, बँकिंग क्षेत्रापुढे खासकरून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना त्यांच्या क्रेडिट कार्ड पोर्टफोलिओमध्ये वाढत्या थकबाकीचे आव्हान निर्माण झाले आहे. रिझर्व्ह बँकेच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ अखेर भारतातील एकूण क्रेडिट कार्ड थकबाकी २.९ लाख कोटी रुपये होती, जी गेल्या वर्षभरात १३ टक्क्यांनी वाढली आहे. भारतामध्ये डिजिटल व्यवहार वाढत असताना क्रेडिट कार्डचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे; मात्र अनेक लोक नियोजनशून्य खर्च करतात आणि त्यामुळे क्रेडिट कार्ड थकबाकी वाढते. याचा वैयक्तिक अर्थकारणासोबतच संपूर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. अनेक लोक उधारीवर खरेदी करण्याची सवय लावून घेतात आणि मासिक उत्पन्नाच्या तुलनेत जास्त खर्च करतात. बँका आणि वित्तसंस्था विविध प्रकारच्या कॅशबॅक, डिस्काऊंट आणि रिवॉर्ड पॉईंटस्च्या नावाखाली ग्राहकांना खर्च करण्यास प्रवृत्त करतात. या ऑफर्सचा फायदा घेण्याच्या मोहात लोक गरजेपेक्षा जास्त खर्च करून आर्थिक संकटात अडकतात. क्रेडिट कार्डची पूर्ण थकबाकी वेळेवर भरली नाही, तर ३६ ते ४२ टक्के वार्षिक व्याजदर लावला जातो. याशिवाय लेट पेमेंट फी, ओव्हरड्राफ्ट चार्जेस यामुळे थकबाकी झपाट्याने वाढते. नोकर कपात, वैद्यकीय खर्च, आपत्कालीन परिस्थितीमुळे अनेकांना क्रेडिट कार्डचा वापर करावा लागतो; मात्र व्यवस्थित परतफेडीशिवाय हा खर्च आर्थिक ओझ्यात बदलतो. व्याजदर आणि विलंब शुल्कामुळे थकबाकी सतत वाढत जाते आणि लोक कर्जबाजारी होतात. काही प्रकरणांमध्ये कर्जाची रक्कम उत्पन्नाच्या दुपटीहून अधिक होऊ शकते, ज्यामुळे लोक मानसिक तणावात जातात. थकबाकी जास्त झाली, तर बँक किंवा वित्तसंस्था वसुली एजंट पाठवतात, ज्यामुळे ग्राहकाला मानसिक त्रास सहन करावा लागू शकतो. काही गंभीर प्रकरणांमध्ये बँक ग्राहकावर कायदेशीर कारवाई करू शकते.

सप्टेंबर २०२४ अखेर सार्वजनिक बँकांमध्ये क्रेडिट कार्ड थकबाकीचे प्रमाण १२.७ टक्के इतके होते, तर खासगी बँकांमध्ये हेच प्रमाण केवळ २.१ टक्के होते. केअर रेटिंग्सच्या अहवालानुसार सार्वजनिक बँकांनी क्रेडिट कार्ड वितरण अधिक आक्रमकपणे केल्यामुळे त्यांच्यात थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. सार्वजनिक बँका आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी क्रेडिट इतिहास मर्यादित असणार्या ग्राहकांना क्रेडिट देतात. याउलट खासगी बँका मजबूत क्रेडिट प्रोफाईल असलेल्या ग्राहकांवरच भर देतात. रिझर्व्ह बँकेच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ अखेर भारतातील एकूण क्रेडिट कार्ड थकबाकी २.९ लाख कोटी रुपये होती, जी गेल्या वर्षभरात १३ टक्क्यांनी वाढली आहे. संपूर्ण बँकिंग क्षेत्रातील सरासरी क्रेडिट कार्ड थकबाकीचे प्रमाण सप्टेंबर २०२४ अखेर २.२ टक्के होते. सार्वजनिक बँकांकडे एकूण १०९ दशलक्ष क्रेडिट कार्डस्पैकी २४ टक्के कार्डस् आहेत. एसबीआय, बँक ऑफ बडोदा आणि कॅनरा बँकेकडे सार्वजनिक बँकांमधील एकूण क्रेडिट कार्ड थकबाकीच्या ९४ टक्के वाटा आहे. एसबीआय क्रेडिट कार्डस् ही देशातील दुसर्या क्रमांकाची सर्वात मोठा क्रेडिट कार्ड प्रदाता कंपनी असून त्यांच्या ग्रॉस क्रेडिट खर्चाचा दर डिसेंबर २०२४ अखेर ९.४ टक्क्यांपर्यंत वाढला, तर त्याचे ग्रॉस एनपीएचे प्रमाण ३.२ टक्के होते. कोरोनानंतरच्या काळात मोठ्या प्रमाणावर असुरक्षित कर्जे वाटण्यात आली. सप्टेंबर २०२१ ते ऑक्टोबर २०२३ या काळात फिनटेक कंपन्यांमधील वाढत्या स्पर्धेमुळे सार्वजनिक आणि मध्यम आकाराच्या खासगी बँकांनी आक्रमक कर्जवाटप केले. काही बँकांनी पारंपरिक मेट्रो आणि मोठ्या शहरांच्या पलीकडे जाऊन लहान शहरांमध्येही ग्राहक जोडले. त्यामुळे क्रेडिट स्कोअरची पडताळणी शिथिल झाली. कोरोनाच्या पहिल्या लॉकडाऊनमध्ये थकबाकी वाढल्यानंतर फिनटेक कंपन्यांनी 'बाय नाऊ, पे लेटर' आणि ई-कॉमर्ससाठी 'चेकआऊट फायनान्सिंग' असे नवे क्रेडिट उत्पादन आणले. यामुळे ग्राहकांचे खर्च वाढले; परंतु आरबीआयने फिनटेक कंपन्यांच्या असुरक्षित कर्ज वाटपाला आळा घालण्याचे प्रयत्न सुरू केले.

# ओबीसी,आकाशातल्या स्वर्गापेक्षा, मुंबईचा जमीन मालकी हक्क महत्वाचा आहे.

ईस्ट इंडियन समाज हा सागरपुत्र आगरी कोळी भंडारी आदिवासी समाजाचा सख्खा भाऊ आहे. २०१६/१७ साली मुंबईच्या गावठाण हक्कांचा लढा सुरू करताना, हा आमच्यातील बंधुत्वाचा अनुभव मी घेतला.आधुनिकता,शिक्षण,उच्च राहणीमान, साऱ्या जगाशी जोडलेला,अत्यंत सुसंकृत आणि प्रचंड मायाळू असा हा ईस्ट इंडियन भाऊ आहे.त्यांच्या गावात,घरात जाऊन प्रत्यक्ष अनुभवला पाहिजे.मुंबईचे माजी नगरसेवक आल्मेडा साहेब,ड. गॉडफ्री पेमेंटा,ड.विवियन डिसोझा,जॉन्सन मिस्किटा,डेनिस डिसुझा असे एक एक प्रेमळ भाऊ मुंबई गावठाण चळवळीचे आधारस्तंभ आहेत.ज्यांच्या सहवासात जमिनीवरचे स्वर्गसुख अनेक ईस्ट इंडियन सांस्कृतिक कार्यक्रमात मी अनुभवले आहे.

सांताक्रूझ मुंबई येथील डिसुझा बिल्डिंग मुंबई महानगर पालिकेने २०१४ साली धोकादायक ठरवली.अर्थात ती २०२४ पर्यंत पडली नाही.आजही ती पाडण्यासाठी जेसीबी मशीन लागतील.स्वतःच्या मालकीच्या जागेत असलेली ही इमारत आहे. शासकीय परवानगीने बांधली आहे.ती अतिक्रमित नाही की अनधिकृत नाही.१९७२ साली रहिवाशी लोकांनी स्वतः बांधली.मुंबईतील अनेक १०० वर्षे जुन्या इमारती धोकादायक नाहीत?.मग पन्नास वर्षे जुनी केवळ दोन मजली इमारत धोकादायक कशी? मुंबई महानगर पालिकेच्या पॅनल वरील मेहता नावाचा स्ट्रक्चरल ऑडिटर एकदा ही इमारत राहण्यास अयोग्य,धोकादायक ठरवतो.तोच मेहता ऑडिटर,डिसुझा बिल्डिंग रहिवाशी मंडळाच्या खर्चाने केलेल्या रिपोर्ट मध्ये, इमारत दुरुस्त करून राहण्यास योग्य आहे असे म्हणतो.धोकादायक नाही असे म्हणतो.लोकांनी स्वतः खर्च केला.आजपर्यंत राहिलेही.परंतु मुंबई महानगर पालिकेने,पोलिस घेऊन इमारतीचे पाणी आणि वीज कनेक्शन तोडले.कायद्याचे लॉजिक काय असावे? ७०० कोटी रुपयांची जमीन चोरी? ७० ते ८० वयाच्या वयोवृद्ध महिला येथे राहतात.परीक्षा देणारे विद्यार्थी राहतात.वीज पाण्याविना त्यांची झालेली बिकट अवस्था सांगायला माझे शब्द अपुरे पडतील. लोकांनी इमारत सोडावी,असे मुंबई महानगर पालिका,पोलिस,न्यायालय यांना वाटते.परंतु ही इमारत तोडल्यानंतर,वन रूम किचनचे,चाळीस हजार रुपये भाडे असलेल्या या उच्चभ्रू वस्तीत घर कुणी द्यायचे? म्हातारी माणसे ,विद्यार्थी जाणार कुठे?

लोकांचे जीव वाचवायला सरकार निघाले? की आम्हाला मारायला निघालेय? आमचे लोक,आमची लोकशाही हा प्रश्न मुंबई महानगर पालिका प्रशासन,न्यायालय,पोलिस यांना विचारू शकते का? माझ्या पत्रकार बांधवानी मला सांगावे.आता मुंबई महानगर पालिकेत लोकप्रतिनिधी नाहीत.नगरसेवक नाहीत.ओबीसी इम्पीरीकल डेटा नाही. म्हणून आमचे स्थानिक स्वराज्य संस्थेतले ओबीसी राजकीय हक्क संपवून,उच्च जातीय हुकूमशाही,आम्हा स्त्री शूद्र अतिशूद्र यांना उध्वस्त करतेय? मुंबई हुकूमशाही कडे निघालीय का? सर्व राजकीय पक्षांनी,नेत्यांनी उत्तर द्यावे.ही माझी नम्र विनंती आहे.ख्रिश्चन मुस्लिम हिंदू सारे भारतीय येथे राहतात. परंतु संकटात मदत करणारा कोणताच धर्म,नरक यातना भोगणाऱ्या डिसुझा बिल्डिंग रहिवासी लोकांना,अजूनही सापडलेला नाही.मलाही दिसत नाही.आम्ही मुंबईचे भूमिपुत्र मानवता,माणुसकी विसरलोय का? झाडाचे जोडलेले पान एकदा तोडले की पुन्हा जोडता येत नाही. असे भगवान बुद्ध म्हणाले होते.लोकांची राहती घरे पोलिस बंदोबस्तात तोडणाऱ्या,शासनाच्या जबरदस्तीच्या बुलडोझर संस्कृतीला कुणी तरी बुद्ध काय म्हणाले? हे समजाऊन सांगेल का? मागासवर्गीय,ओबीस,एससी,एसटी,अल्पसंख्याक, ख्रिश्चन मुस्लिम ही माणसे आहेत.दगड विटांची घरे तुटतात तशी ही भारतीय माणसे कोणत्याही युद्धाशिवाय मनाने तोडली जात आहेत. इकडे जरा लक्ष द्याल? खऱ्या अर्थाने धोकादायक नसलेली ही इमारत धोकादायक का ठरवली गेली?. तिथे राहणाऱ्या लोकांना स्वतःचा जीव प्यारा नाही का? मुंबई महानगर पालिका, न्यायालय,पोलिस हे मुंबईकर भूमिपुत्र ईस्ट समाजाच्या लोकांवर एवढे फिदा का झाले? या सर्व प्रश्नांचे एकच उत्तर आहे.बिल्डर जमात.

मुंबईचा विकास करायला उतावीळ झालेले बिल्डर मागासवर्गीय वस्त्यांत जाऊन विकास करत आहेत.किती मोठी समरसता? ज्यांना पूर्वी अस्पृश्य ठरविले.प्यायचे पाणी नाकारले.असे सारे उच्चवर्णीय बिल्डर,राजकारणी,पोलिस,पालिका अधिकारी आमच्या गलिच्छ वस्त्या विकसित करायला निघाले?. केवढे हे सामाजिक परिवर्तन?. मुंबईतली सर्वात मोठी गलिच्छ झोपडपट्टी धारावी मोदी मित्र अदानी आपल्या पवित्र हस्ते विकसित करीत आहेत?. अयोध्या क्षत्रिय राम मंदिर निर्मिती पेक्षा, मागास शूद्र अतिशूद्र मुस्लिम ख्रिश्चन यांना घर देणे, पुण्याचे हे काम देव दुर्लभ असेल,नाही का? कितीहा वर्षे आरक्षण,घरे,रेशन दिले.तरी विकास मात्र उच्च वर्णियांचाच होतो.मागासवर्गीय मागेच का राहतात.असे का होते?.असाही प्रश्न ८५ टक्के स्त्री शूद्र अतिशूद्र या जन्माने मागास ठरवलेल्या लोकांच्या विरोधकांना पडत असेल? परंतु मनुस्मृतीचा काळ असो की भारतीय संविधानाच्या लोकशाहीचा,फसवले जातात मागासवर्गीय लोकच.अल्पसंख्यांक लोकच.अतिशय नियोजन पद्धतीने भारतात ब्राह्मण क्षत्रिय वैश्य लॉबी काम करीत आहे. डिसुझा इमारत ही त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे.दुसरीकडे महिलांच्या वारस नोंदी न करताच कल्याण डोबिवलीच्या पिकत्या शेतजमिनी बिनशेती दाखवून पोलिसांच्या मदतीने लोढा बिल्डर लुटतोय.



संविधानाने दिलेले अल्पसंख्यांक अधिकार गेले कुठे.केवळ ईस्ट इंडियन्स नाही तर आम्ही आगरी कोळी भंडारी आदिवासी या ठाणे रायगड पालघर नवी मुंबई येथे अल्पंख्यक झालोय.बहुसंख्या असलेला हिंदू मध्ये शूद्र ओबीसींच्या जमिनी लुटतोय उच्चवर्णीय हिंदू. ईस्ट इंडियन ख्रिस्ती प्रार्थना मंदिर जे हेरिटेज आहे.ते तोडणार का? मागे सायन कोळीवाड्याचा काही हेरिटेज किल्ला परिसर असाच महानगर पालिकेने बिल्डर साठी उध्वस्त केला होता.कुठे आहे पुरातत्व विभाग? ईस्ट इंडियन डिसुझा बांधवांची सांताक्रूझ परिसरात शेती होती.घरे आणि गावठाण होते.ते पूर्वीचे हिंदू आगरी कोळी भंडारी आदिवासी होते. वर्तमान काळात होणाऱ्या अशाच प्रकारच्या हिदू उच्चवर्णीय शोषणास वैतागून त्यांनी धर्मांतर केले.अलीकडे संविधान कार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारला.शोषक हिंदू धर्म नाकारला. अर्थात ईस्ट इंडियन समाजाने धर्मातर करून खूप प्रगती केली.जमीन मालकी हक्क मात्र तो विसरला आहे.सायन कोळीवाड्यातील आगरी कोळी भंडारी ईस्ट इंडियन यांना हातोहात फसविणारे बिल्डर,पोलिस,मुंबई महानगर पालिका यांना मी स्वतः पाहिलेय.मी त्या सायन कोळीवाड्यासाठी रस्त्यावरचा संघर्ष केलाय.मला माझी ताकद कमी पडली याचे कायम दुःख आहे.माझ्या मुंबईकर भावा बहिणी यांना धोका समजत नाही.शत्रू समजत नाही.जमिनीचे मालकी हक्क समजत नाहीत. त्यासाठी करण्याचा सत्याग्रह,संविधानिक संघर्ष,लोकनेते दि बा पाटील यांच्यासारखा सर्वस्वाचा त्याग,ओबीसी समाजाचे लोकशाही संघटन समजत नाही.

शासनाने पारंपरिक,वंशपरंपरेने वहिवाट जमीन मालकीची लेखी सनद डिसुझा रहिवाश्यांना दिली आहे.कारण आपले गाव,शेती व्यवसाय त्यांनी सांताक्रूझ मुंबईच्या विकासासाठी देऊन मोठे बलिदान दिले होते.जसे नवी मुंबईच्या आगरी कोळी कराड्यानी सिडको नवी मुंबई साठी दिले आहे.अर्थात ईस्ट इंडियन येथेही नवी मुंबईत होते.ओबीसी मागास वर्गीयांचा त्याग देश नेहमीच विसरतो. सरकारने दिलेली मालकीची सनद जिल्हाधिकारी बांद्रा यांच्या परवानगी शिवाय हस्तांतरित होत नाही.परंतु मृत ईस्ट इंडियन आजोबांच्या नावे असलेली जमीन मांलकी षड्यंत्र करून संपवण्यात आली.कायदेशीर वारस नोंद झालीच नाही.आमचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची जिवंत सातबारा म्हणजे वारस नोंद योजना आहे कुठे? बिल्डरांनी ती जन्मन्या अगोदरच तिची वाट लावली आहे.मालकीच्या जागेत डिसुझा इमारत उभी असताना ती कागदोपत्री चोरीला गेली आहे. तीही दिवस रात्र जागी असणाऱ्या माया नगरी मातृसत्ताक मुंबईतून? बिल्डरांनी गोड बोलून भोळ्या ईस्ट इंडियन भूमी पुत्र समाजाचा काटा काढला.विकास करतो,असे सांगून स्वतःच्या नावे,बेकायदेशीर खरेदी खत नोंदविले आहे.हजारो कोटींचा हा भ्रष्टाचार मुंबई महानगर पालिकेच्या आवारात होत आहे.महानगर पालिकेत निवडणुका नाहीत.नगरसेवक लोकप्रतिनिधी नाहीत. प्रशासक बिल्डर धार्जिणे निर्णय घेतात.न्यायालये प्रत्यक्ष परिस्थिती पाहत नाहीत.कागदी घोडे बिल्डर हलवितात.नोटांचा चारा घोड्यांना घालतात. बिचारी रयत छत्रपती शिवरायांनी दिलेल्या स्वराज्याच्या आठवणी सांगत अशी रोज मरत आहे.मागील वीस वर्षे जमीन पोखरण्याच्या हालचाली सुरू होत्या.भूमी अभिलेख विभाग, जिल्हाधिकारी हे जमीन मालकी पाहतात.ही सत्य गोष्ट सांगूनही आमचे मुंबई कर तिकडे कधी जात नाहीत.डिसुझा बिल्डींचा घात असा झाला आहे.नव्हे ठरवून केला आहे.मुंबई पोलिस आयुक्तालयात,अल्पसंख्याक आयोगात तक्रार नोंदविली आहे.

इमारत आजही उभी आहे.परंतु जमीन मालकी, इमारत तुटल्यानंतर डिसुझा बांधवांची राहील.लढावे लागेल.त्यासाठी पैसा मनुष्यबळ लागेल.हेच सत्य माझ्या ईस्ट इंडियन बांधवांना समजत नाही.लोक घाबरून ही जागा सोडून गेले? तर बिल्डर ताबा घेईल.त्यासाठीच मुंबई महानगर पालिका पोलिस यांनी लाईट पाणी तोडले.ईस्ट इंडियन समाज,चर्च त्यांचे सर्व फादर,समाजसेवक यांना विनंती आहे.आपण तत्काळ मदत करून, मनाने तुटणाऱ्या डिसुझा बंधू भगिनींना मायेचा,मदतीचा हात द्या.जे मुंबईत घडतेय ते उद्या ठाणे पालघर रायगड,नवी मुंबईतही घडणार आहे.आगरी कोळी भंडारी आदिवासींनी मुंबई आमची आहे.हे समजून घ्यावे.त्याचे लिखित पुरावे जिल्हाधिकारी भूमिअभिलेख येथे आहेत.ते पहा.जगायचे असेल तर घर गावठाण जमीन हवी.आकाशातला देव,आकाशातला स्वर्ग काय कामाचा? बुद्ध,चार्वाक,महावीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकनेते दि बा पाटील म्हणाले.तेच आम्ही गावठाण चळवळीचे लोक ओरडून सांगतोय.मुंबई वाचवा,स्वतःला,आईला,बहिणीला,भावाला, मुलाना,मित्रांना वाचवा.उद्या या मुंबईत.डिसुझा बिल्डिंग सांताक्रूझ मुंबईला.सारे सांगेन.येथे लिहायला जागा कमी पडते.

*****


राजाराम पाटील
८२८६९३१४६३.
उरण जिल्हा रायगड.

# बौद्धाची (महाराची) पोर पुन्हा वाचण्याकडून नाचण्याकडे.

इतिहास वाचाल तर इतिहास घडविता येतो. आम्ही महार घरी गाणं आणि ब्राम्हणा घरी लिहणं वाचले होते. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९ जून १९५० रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मिलिंद महाविद्यालयाची स्थापना औरंगाबाद येथे केली होती. मिलिंद कॉलेज ऑफ सायन्स,मिलिंद कॉलेज ऑफ आर्ट्स आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स,असा तीन शैक्षणिक महाविद्यालयाच्या पदवीधारकांचा गट आहे.५४ एकर परिसरामध्ये म्हणजेच नागसेन वनात हे महाविद्यालय पसरलेले आहे.हैदराबाद संस्थानाचा सातवा निजाम मीर उस्मान आली खान यांच्या कडून सुरुवातीला मिलिंद महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी जमीन देण्यात आली. हा इतिहास किती लोकांना माहिती आहे. हे सांगता येत नाही १९५० नंतर किती मूलमुली पदवीधर होऊन बाहेर गेले,ते कुठे किती मोठे प्रशासकीय अधिकारी झाले,त्यांचे या शिक्षण क्षेत्रातील चळवळीत आज काय योगदान आहे.हा संशोधनाचा सत्य शोधनाचा विषय आहे.समाजातील मुलामुलीने शिकावे,संघटीत व्हावे आणि नंतर संघर्ष करावा यासाठी शिक्षणसत्ता केंद्र निर्माण केले होते.ते कोणत्याही एका जाती धर्मापुरते नसून पिपल्स म्हणजे (लोक जनता) लोकशाही प्रणीत तमाम बहूजन समाजातील अज्ञान दूर करण्यासाठी आणि मनुस्मृतीचे जळमटं नष्ट करुन आत्मनिर्भर आणि शोषण, भयमुक्त समाज निर्मितीसाठी बाबासाहेबांनी उचललेल ते क्रांतिकारी पाऊल होते.त्यांचा आदर्श किती विद्यार्थ्यांनी घेतला हा पण एक संशोधन करण्याचा विषय आहे.

शिक्षणात नोकरीत पदोन्नतीत आरक्षणाची सवलत घेणारे अनेक विद्यार्थी आहेत,पण त्यातील किती गर्वाने मी मिलिंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे हे सांगणारे आहेत?. ज्ञानाची ज्योत व जागृतीचा अग्नी अखंड तेवत ठेवण्यासाठी यांनी काय काय केले. हे गर्वाने सांगू शकत नाही.म्हणूनच नाचण्यामुळे आपल्या अनेक पिढ्या बदनाम झाल्या,बर्बाद झाल्या. व्यवस्थेच्या बळी ठरल्या.नाच तमासे उभे करून चार पैसे कामावले असतील पण त्या चार पैशाने केलेले शोषण अत्यंत अमानवी होते.हे सत्य परिस्थिती सांगणारी त्यासाठी निर्भयपणे बोलणारी पिढी आज मला कुठे दिसत नाही.सेवानिवृत्ती नंतर समाजात मिसळणारे लग्न कार्यात पुढे पुढे करणारे आम्ही मिलींद महाविद्यालयात शिकून मोठे अधिकारी झालो,आम्ही हे केले आम्ही ते केले.हे सांगतांना मुलामुलींचे शिक्षण,गाडी बंगला,हे मोठ्या अभिमानाने सांगतात.पण आंबेडकरी विचारांच्या शैक्षणिक,सामाजिक,सांस्कृतिक,कला,क्रीडा आणि कामगार संघटनेत आपले योगदान काय हे कधीच सांगत नाही.सरकारी नोकरी होती म्हणून राजकीय चळवळीत सहभागी होऊ शकत नव्हता. पण यात का सहभागी होऊ शकले नाही. यांचे ही उत्तर त्यांच्या कडे असते,मुलामुलींचे शिक्षण होते, नंतर नोकरी, लग्न कार्य यातून वेळच मिळाला नाही,आता सेवानिवृत्ती नंतर प्रत्येक ठिकाणी सहभागी होण्यासाठी वेळ मिळतो. पण हेच सांगितल्या जाते मी मोठा अधिकारी होतो,मला सर्व कसे घाबरत होते.मला कसा मान सन्मान मिळत होता.आताची तरुण पिढी मला ओळखत नाही. त्यांना दहावी,बारावी नपास कार्यकर्ता मोठा वाटतो. ही खंत अनेक अधिकारी व्यक्त करतांना मी पाहिले.

मिलिंद महाविद्यालयच्या उभारणीच्या वेळी पट्टे बापूराव यांच्याकडून देऊ केलेली पैशाची थैली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नाकारली. आणि म्हणाले, आमच्याच आई बहिणी नाचवून कामाविलेला पैसा माझ्या महाविद्यालयासाठी नको भगवान बुद्ध सुद्धा नाचणे आणि नाच पाहणे वर्ज्य करण्यास सांगतात.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नाचणाऱ्या समूहाला वाचण्याकडे वळविले.मुलं वाचू लागली,शिकू लागली. मोक्याच्या जागा काबीज करू लागली.चार पैसे गाठीला बांधू लागली.झोपडीतून बंगल्यात आली एक सजग सशक्त समाज उभा राहू लागला होता.अलीकडे स्थिरवत चाललेली आर्थिक सुबत्तता आम्हाला प्रसिद्ध मंदिराकडे खेचू लागलीय,मोठी मोठी माणसे आपल्या संपन्नतेचे प्रदर्शन करून इंपोर्टेड कारने फिरू लागली.आपले वैभव दाखविण्यासाठी घरात गणपती उत्सव साजरा करायला लागले. लग्न पत्रिकेवर कचरू महाराज प्रसन्न,वित्तू बाबा प्रसन्न लिहायला लागले. त्यांना तीन प्रकारच्या लग्न पत्रिका छापाव्या लागतात.तरी कुटुंबातील सदस्य मेल्यावर काहीच लपवता होत नाही.माणसं घडविणारा कारखाना आणि अश्वगतीने काम करणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी याकडे सोयीसकर पणे दुर्लक्ष करतात. त्याच लोकांनी १४ एप्रिल हा आमच्या बाबाचा जन्मदिन मोठ्या थाटमाटतात साजरा केलेला पाहिला.आणि एक प्रश्न पडला आम्ही नेमके कुणीकडचे?.




आता महापुरुषांची संयुक्त जयंती ही मोठ्या जल्लोषात साजरी केली जाते.लाखो रुपये खर्च करून सभागृहात सुंदर अशा कार्यक्रमाचे आयोजन,नियोजन केले जाते, एकापेक्षा एक भारदस्त गायक आपली गायकी सादर करून लोकांना मदहोश मंत्रमुग्ध होऊन नाचायला भाग पडतात.रमाईचा त्याग,संस्कार,कुटुंबवत्सलता,जिद्द,चिकाटी, करुणा या गुणांचा वसा,वारसा घेतांना महिला दिसत नाही.पण नांदन नांदन होत रमाचं नांदन या गाण्यांवर महिला बेधुंद होऊन जेव्हा ठेका धरतात तेव्हा त्यांना काय म्हणावे समजत नाही. त्या रमाईचा कोणता आदर्श डोळ्यासमोर ठेवतात हा मोठा प्रश्न आहे.

कधीकळी नाच आमच्या भाकरीचे साधन होते पण आम्ही तो नाद सोडला तो आता परत धरायला नको.सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणारे आणि सुरक्षित ठिकाणी राहणाऱ्या कुटुंबातील महिला लग्नाच्या हळदीच्या कार्यक्रमात सिरियल सिनेमा सारखे हळदीच्या गाण्यावर नाचण्यासाठी प्रशिक्षण घेत आहेत.म्हणजेच सर्व काही वाचण्याकडून नाचण्याकडेच वाहणे चालू आहे.असे लिहावे लागत आहे. लग्नात,जयंतीत दारू पिऊन नाचणाऱ्याची संख्या वाढली आहे. त्यांना रोखण्याची कोणाची हिंमत होत नाही. त्यामुळेच एक पंधराचे लग्न तीन तासाने उशिरा लागते. लोकं हताश होऊन जातात. पर्याय नसतो. १३४ व्या भिम जयंतीत डिजे लावण्यावर मंडळाचा मोठा भर आहे तर स्थानिक पोलिस अधिकारी त्यांना डी जे लावण्यावर सुप्रीम कोर्टाची मनाई आहे असे सांगत आहेत. तरी कार्यकर्ते ते समजून घेण्यास तयार नाही. डी जे शिवाय नाचण्याला काहीच मज्ञा नाही. म्हणजेच आमच्यासाठी भिम जयंतीत नाचणे खूप महत्वाचे झाले आहे. क्रांतिकारी विचारांचे काय?. हा प्रश्न उभा राहणार आहे.बाबासाहेब सांगत होते चळवळ हे तुमच्या उदरनिर्वाहाचे साधन समजू नका,ते व्यवस्था परिवर्तनाचे माध्यम आहे. आज चळवळ कोणत्या विचाराने कोणत्या दिशेला चालली यावर चर्चा होत नाही. माझ्या सारखा बोलायला लिहायला लागला तर तो एक नंबर शत्रू ठरत आहे. म्हणूनच मी बौद्धाची (महाराची) पोर पुन्हा वाचण्याकडून नाचण्याकडे वळत आहेत हे लिहत आहे.विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करतांना आपण त्यांचा कोणता आदर्श घेतला आणि त्यांचे काय आचरण करतो,यांचे आत्मचिंतन अपेक्षित आहे.पण ते कोणी करावे?. आजची पिढी जेव्हा संघर्ष करते तेव्हा उद्याची पिढी सन्मानाने जागते. आणि आजची पिढी जेव्हा लाचार होते तेव्हा उद्याची पिढी गुलाम बनते. यावरूनच आपला प्रवास कोणत्या दिशेने सुरू आहे हे चित्र स्पष्ट होते.

********

सागर रामभाऊ तायडे
९९२०४०३८५९,
भांडुप,मुंबई.

# भिमजयंती.... भिमाचे विचार किती?

जन सामान्माचा उद्धार
फक्त भिमाने येथे केला रे
महिलांचा करून सन्मान
हक्क अधिकार दिला रे
मिठालाही जानणारा समाज
भिमाला बेईमान का झाला रे?

भिमजयंती आली की हंगामी आंबेडकरवादी जागृत होतात आणि भिमजयंती धुमधडाक्यात साजरी करण्याचे नियोजन करतात. जयंती धुमधडाक्यात साजरी करायची म्हणजे काय तर समाजातुन वर्गणीच्या नावाने पैसा गोळा करायचा, मोठ मोठे बॅनर लावायचे, मिरवणुकीत डिजे लावायचा, मद्यपान करून मनसोक्त नाचायचे. मिरवणुकीत घसा कोरडा होईपर्यंत जयघोष करायचा, मानुस माणसा पासून दुर जाईल असे नारे द्यायचे हिच धुमधडाक्यात जयंती. काही काही ठिकाणी तर वैचारिक जयंतीच्या नावाखाली गाण्याचा, भाषणाचा कार्यक्रम ठेवायचा, ज्यातून केवळ मनोरंजन आणि चुकीचे बाबासाहेब सांगुन बाबासाहेब आंबेडकर यांना संकुचित करून पैशाचे मोठे पाकीट घेऊन स्वतः चा धंदा मात्र मोठा करायचा याला म्हणायचे धुमधडाक्यात जयंती साजरी करणे. मुळात आपण महापुरुषांच्या जयंती साजरी का करतो? जयंती साजरी करण्याचा उद्देश काय आहे हा उद्देशच जयंती मधून निघून जाऊन निव्वळ मनोरंजन व नाचगाणी याने जागा घेतली आहे. अनेक गाण्या मधुन, अनेक पाकिट घेऊन बोलणाऱ्या वक्त्याच्या भाषणामधुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची व विचाराची चुकिची आणि संकुचित मांडणी केली जाते. याच कारणामुळे देशाला एकसंघ ठेवणारे, अडाण्याला शिक्षीत करणारे, मुक्याला बोलायला लावणारे, लंगड्याना चालायला लावणारे, सर्वांना समान हक्क अधिकार बहाल करणारे, ज्यांच्या अनेक पिढ्या गुलामीत आणि लाचारीत गेल्या अशा लोकांना सत्तेत बसवणारे, जाती पंथावरून हिनवल्या जाणाऱ्या सर्व जातींतील लोकांना अधिकारी करणारे, माणसामध्ये स्वाभिमान, सन्मान आणि वैचारिक उर्जा भरणारे, महिलांना सन्मान, सलाम, व पुरुषांप्रमाणे स्थान देऊन त्यांचे रक्षण करणारे, कामगारांचे उद्धारक, शेतकऱ्यांचे कैवारी, विद्यार्थांचे मार्गदाते, आणि महिलांचे रक्षणकर्ते, मी प्रथम आणि अंतिमतः भारतीय असे ठणकावून सांगणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर आजही घराघरात मनामनात पोहोचले नाही याचे एकमेव कारण गायक, कवी, वक्ते, लेखक यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने दुकानदारी सुरू केली आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य मर्यादित करून सांगितले. जयंती साजरी करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर, विचारावर जागृती होणे आवश्यक आहेच परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना किमान जयंती साजरा करणारे मंडळ, गाणारे, बोलणारे, लिहणारे लोक तरी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालतात का यावर सुद्धा चिंतन होणे आवश्यक आहे. आज बरेच लोक बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी करताना चुकिची, द्वेषाची व एकांगी करतात. देशाचे व देशातील जनतेने उद्धारक असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जात किंवा धम्म बघुनच जर होत असेल तर याची नैतिक जबाबदारी कोणी घ्यायची? बाबासाहेब आंबेडकर यांची चुकिची मांडणी करायची, त्यांचा संबध एका जातीशी आणि धर्माशी जोडायचा, बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन द्वेषात्मक नारे द्यायचे, दारु प्यायची, जातीचा गर्व बाळगायचा आणि मग म्हणायचे बाबासाहेब आंबेडकर जयंती सर्वांनी साजरी केली पाहिजे. परंतु येथे स्वतः च बरोबर न वागता इतरांकडून अपेक्षा केली जाते. भिमजयंती साजरी करताना आनंद नक्कीच असायला पाहिजे. परंतु त्याचा अतिरेक होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचेच विचार पायदळी तुडविले जातील तर आपणच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे मारेकरी आहोत हे मान्य करावे लागेल. आज मोठमोठ्या बॅनर वर बेरोजगार, बेवड्या लोकांचे फोटो घेतले जातात. कशासाठी? फक्त नाव आणि मोठेपणा. पण त्याच बॅनर वर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार लिहून जनजागृती करणार नाहीत. लाखोंरुपयांचा डिजे लाऊन तरुण तरुणी नाचवतील परंतु डिजे चा खर्च कमी करून एखाद्या गरिब होतकरू विद्यार्थांचा खर्च उचलणार नाहीत. एक वही पेन असे कार्यक्रम सुरु झाले. लहान वही पेन वाटून मोठमोठे फोटो काढणे केवळ देखावा झालेला आहे. जयंती साजरी होताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार कुठे दिसत नाहीत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश आहे. शिका संघटीत व्हा संघर्ष करा. आम्ही शिकलो, संघटीत न होता स्वतः च्याच संघटना काढल्या, आणि स्वतः संघटनेच्या माध्यमातून स्वतः चे पोट भरण्यासाठी लाचारी, बेईमानी करून संघर्ष सुरू आहे. आणि म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ, विचार व आचार आज मर्यादित होत आहे. बाबासाहेब आंबेडकर बौद्धांची खाजगी संपत्ती असल्या सारखे लोक वागत आहेत परंतु स्वतःला बौद्ध समजणारे लोक भिमाच्या मताचे नाहीत ही शोकांतिका आहे. म्हणून वामनदादा म्हणतात.

भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते
वाणीत भीम आहे, करणीत भीम असता
वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते.
तत्वाची जाण असती, बिनडोक लोक नसते
सारे चलन तयांचे ते रोखठोक असते.
सदभाव एकतेचे जर अंतरात असते
चुकले कुणीही नसते सारेच एक असते

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने बेकी करून स्वतः चा स्वार्थ साधणारे धुर्त लोक तयार झाल्याने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एकतेचा संदेश दिला हे बोलण्याचा तरी अधिकार आहे का? तत्व विसरल्याने सर्वजन बिनडोक सारखे वागून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अवमान करत आहेत. प्रत्येकाला स्वाभिमान देणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव घेऊन आज अनेक जन लाचारी करत आहेत आणि लाचार लोक जयंती मध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहेत तेथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची खरचं पेरणी होईल का? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी खंत व्यक्त केली होती ती म्हणजे मला शिकलेल्या लोकांनी धोका दिला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी असे का म्हणले होते यावर ही विचार विनीमय होणे आवश्यक आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः च्या कमाईतून परदेशात काही लोकांना शिक्षणासाठी पाठवले होते. शिक्षण पुर्ण झाल्यावर त्या लोकांनी समाजाकडे वळुनच बघितले नाही. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते शिक्षण फक्त पोटभरण्याचे साधन नाही तर सामाजिक विकासाचे माध्यम आहे. परंतु त्याकाळी शिकलेल्या लोकांनी बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित काम केले नाही. तर आजही शिकलेले व मोठ्या पगारावाले लोक खरचं गरजू लोकांच्या शिक्षणावर, आरोग्यावर, रोजगारावर खर्च करतात का? एकटे बाबासाहेब शिकले तर त्यांनी पंचवीस पेक्षा जास्त लोकांना परदेशात स्व खर्चाने पाठवले. आज अनेक लोक शिकले त्यांनी किती विद्यार्थ्यांना शिकवले? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्म सोडून बौद्ध धम्म स्विकारला, देवांना नाकारून विज्ञान दिले अशी मांडणी करून बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा हिंदु व देव देवता विरोधी करून हिंदु धर्मातील लोकांपासून अलगद बाबासाहेब आंबेडकर यांना दुर करण्याचा प्रयत्न दररोज जयभीम बोलणारे लोकच करत आहेत. शिकलेले लोक आजही स्वतः चे घर, स्वतः चे मुलं मुलांचे भविष्य यातच मग्न आहेत. यातील बरेच लोक बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनावर मोठ मोठे भाषण देतात पण बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे आचरण करून एखाद्या ला रोजगार, एखाद्या ला शिक्षण उपलब्ध करून देत नाही ही शोकांतिका आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्याचा जास्तीत जास्त फायदा हिंदु धर्मातील लोकांनाच झाला, शेतकरी, कामगार, महिला यांच्या उद्धाराचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले संख्येने जास्त तेच आहेत. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आरक्षणाचे ९९% लाभार्थी हे हिंदुच आहेत. हिंदू कोड बिलामधुन हिंदु महिलांचाच उद्धार झाला ह्या गोष्टी पाहिजे त्या तिव्रतेने कोणी मांडत नाही. आमचा बाप, आमचे संविधान म्हणु म्हणु खरे बाबासाहेब व खरे संविधान लोकांपर्यंत पोहचलेच नाही. खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची वैचारिक जयंती साजरी झाली असती तर कमीत कमी बौद्धांमध्ये एकी निर्माण झाली असती, याच एकितुन बौद्धांकडे स्वतःचे व्यवसाय जसे बँक, शाळा, कॉलेज, हॉस्पिटल असते. त्यातून समाजाची सेवा व सामाजिक विकासही झाला असता. परंतु आज एकही मोठी बँक, शाळा, कॉलेज, हॉस्पिटल सोडा पण वृत्तपत्र ही नाही. काही लोक वृत्तपत्र काढतात परंतु शिकलेले लोक ते वृत्तपत्र वाचत नाहीत आणि ते चालविण्यासाठी अर्थ सहाय्य पण करत नाहीत हि शोकांतिका आहे. जगाने मान्य केले की ज्ञानाचे प्रतिक हे डॉ बाबासाहेब आंबेडकर आहेत आणि त्याच बाबासाहेब आंबेडकरांबद्दल आपल्याच देशात अज्ञान आहे. प्रत्येक जन सोईनुसार बाबासाहेब आंबेडकर सांगत आहेत परंतु खरे बाबासाहेब अजूनही लोकांना समजले नाही. दरवर्षी जल्लोषात जयंती साजरी होऊनही जर बाबासाहेब आंबेडकर घराघरात पोहचले नसतील तर अशी जयंती साजरी करून आपण काय साध्य करत आहोत? पगार घेणारे लोक हजार पाचशे रुपये नाचगाण्याबठी देऊन सामाजिक कार्य पुर्ण केल्याचा आव अंगात आणतात पण बाबासाहेब म्हणाले होते उत्पनातील विसावा भाग समाजासाठी द्या. नाचगाणी म्हणजे समाज का? आणि खरचं विसावा भाग नियमित देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे इमानदार अनुयायी किती? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गाने कोणताही व्यक्ती, समाज जर चालला तर त्यांचे कल्याणच होणार परंतु बाबासाहेब आंबेडकर यांना बौद्ध म्हणून बंधिस्त करणे आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचे पालन न करणे हाच मोठा द्रोह आहे. समाजाच्या हितासाठी, माना सन्मानासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः च्या कुटुंबाकडे दुर्लक्ष केले आहे सर्वांना मानसन्मान मिळवून दिला. म्हणून दादा म्हणतात....

काल मुजरेच केले रे माझ्या मेलेल्या बापाने
लोक मुजरे मला करती भिमाच्या प्रतापाने

काल पर्यंत जो जो समाज या व्यवस्थेला मुजरे करत होता. अर्थात गुलामाचे जिवन जगत होते त्या समाजाला, खितपत पडलेल्या स्त्रियांना सलामी मिळवून देण्याचे काम केले. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकरां नंतर चळवळ व विचाराचे आपण काय केले? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार चळवळ केवळ भाषणात आहे, भाषण देऊन राशन मिळवणारे लोक बाबासाहेब सांगायचे पाच आकडी सहा आकडी रक्कम घेतात त्यातही चुकीचे बाबासाहेब सांगतात, गायक लोकही कमी नाहीत. रक्तात भिम शोधायला लावतात, लोकांना भावनिक करतात, लोक भावनिक झाले म्हणजे दुकानदारी चालते. रक्तात भिम शोधता शोधता विचारातील भिम गायब होत आहे याचे भानच राहिले नाही. विचारातील भिम गायब होणे हे अधोगती, गुलामगिरी व लाचारीचे लक्षण आहे. म्हणून जयंती साजरी करत असताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे विचार पेरणे, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे आचाराचे किती लोक आहेत? ते निर्माण कसे करायचे? समाजातील पैसा खर्च कोठे करायचा या सर्व गोष्टी वर विचारमंथन होऊन जागृतीचा व परिवर्तनाचा जल्लोष सर्वसामान्य मानसापर्यंत पोहचला तरच भिमजयंती धूमधडाक्यात साजरी झाल्याचे सार्थक होईल.

********

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# मानवी कल्याणासाठी युध्द नाकारणारा – सम्राट अशोक !

भारतीय इतिहासातील सर्वात महत्त्वाचा लोककल्याणकारी राजा ज्यांनी अखंड भारताचा नव्हे तर भारतासह बहुतांश भाग काबीज केला होता. भारतीय इतिहासात मौर्य साम्राज्याचे महत्व अनन्य साधारण आहे. अशोक मौर्य हे भारतीय सम्राट आणि मौर्य घराण्यातील तिसरे शासक होते. मौर्य वंशातील सम्राट चंद्रगुप्तांपासुन ते सम्राट अशोकांपर्यंत प्रत्येक राजाने राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा सर्वत्र क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. या राजाच्या परंपरेतील सम्राट अशोकाची इतिहासातील भुमिका अनेकार्थाने महत्वाची ठरली आहे. अशोक हा बिंदुसार या मौर्य सम्राटाचा पुत्र होता. अशोक हा बिंदुसाराच्या अनेक पुत्रांमध्ये शेवटून दुसरा होता. त्यामुळे अशोक मौर्य सम्राट बनेल अशी कोणाची अपेक्षा नव्हती. परंतु अशोकची सेनानी बनण्याची क्षमता वादातीत होती. त्यामुळे साहजिकच इतर भावांचा त्यावरील दुःस्वास वाढला होता. चंद्रगुप्त मौर्याने जेव्हा जैन धर्म स्वीकारून राज्य सुखाचा त्याग केला, त्यावेळेस त्याने तलवार फेकून दिली. ही तलवार शोधून अशोकाने आपल्या जवळच ठेवली. अशोक लहानपणी अतिशय तापट व खोडकर होता. तसेच चांगला शिकारीही होता. त्याला तत्कालीन राजपुत्रांना मिळणारे सर्व शिक्षण मिळाले होते. त्याच्यातील सेनानीचे गुण ओळखून बिंदुसाराने तरुणपणी त्याला अवंतीचा उठाव मोडण्यास पाठवले होते, हे काम त्याने सहज पार पाडले. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये एक महान चक्रवती सम्राट म्हणून अशोकाला मान्यता मिळालेली आहे. तत्कालीन अशोकाचे शिलालेख याची साक्ष नोंदविणारे महत्त्वपूर्ण साधने आहेत. असा विश्वविजेता सम्राट अशोक ज्याला 'चक्रवर्ती' आणि 'अशोक द ग्रेट' या नावांनीही ओळखले जाते.

सम्राट अशोकांना भारताच्या इतिहासात ही सर्वात महान व शक्तिशाली सम्राट म्हणून स्थान दिले आहे, ते जगातील सर्वात महान सम्राट होते. प्राचीन भारताच्या परंपरेत चक्रवर्ती सम्राटांची पदवी ज्यांनी जनमानसावर तसेच भारताच्या मोठ्या भूभागावर राज्य केले अशाच महान सम्राटांना दिली जाते. सम्राट अशोकांना 'चक्रवर्ती सम्राट' असे म्हणतात, चक्रवर्ती सम्राट म्हणजे 'सम्राटांचा सम्राट'. आजचा पाकिस्तान, अफगाणिस्तान पूर्वेकडे बांग्लादेश ते दक्षिणेकडे केरळ पर्यंत तसेच नेपाळ, भूतान, इराण, ताजिकिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या देशांमध्ये अशोकाच्या साम्राज्याच्या सीमा होत्या. अत्यंत शूर आपल्या आयुष्यात एक ही युद्ध हरले नाही असे चक्रवर्ती सम्राट अशोक जगाच्या पाठीवर कोणीही होऊ शकला नाही. सम्राट अशोकाचा जेवढा साम्राज्य विस्तार होता, तेवढा हा पूर्ण भारत देश पण नाही आणि जेवढे वर्षे मोर्य शासकांनी या देशावर राज्य केले, तेवढे इतर कोणीही त्यांच्या आधीही नाही आणि नंतर ही करु शकले नाही.

सम्राट अशोक सत्य, अहिंसा, प्रेम, सहिष्णूता आणि शाकाहारी जीवनप्रणाली यांचे थोर पुरस्कर्ते होते म्हणूनच एक अतिशय परोपकारी प्रशासक अशीच इतिहासात त्यांची ओळख झाली आहे. अशोकाने आपल्या प्रजाजनांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना आपल्या शिलालेखातून काही राजाज्ञा दिलेल्या आहेत. अशोकाचे शिलालेख हे मौर्य इतिहासाचे महत्त्वाचे साधन म्हणून ओळखले जाते. सर्वप्रथम ब्रिटिश अभ्यासक जेम्स प्रिन्सेप यांना अशोकाचे शिलालेख १८३७ मध्ये वाचता आले, ते अनेक भाषांचे अभ्यासक होते. अशोकाचे शिलालेख हे ब्राह्मी, खरोष्टी आणि अरेमाइक या तीन लिपींमध्ये आढळलेले आहेत. त्यातील अनेक अभिलेख हे ब्राह्मी लिपीतील असून ते जेम्स प्रिन्सेप यांनी वाचले, त्यातूनच या चक्रवर्ती सम्राटाच्या आयुष्याची आणि एकूणच मौर्य साम्राज्याविषयीची सखोल माहिती ही अभ्यासकांना मिळालेली आहे. अशोकाने आपल्या शिलालेखामध्ये स्वतः ला 'देवानाम प्रिय' असे संबोधले आहे. कलिंग युद्धानंतर त्याचे झालेले मनपरिवर्तन, त्यांनी स्वीकार केलेला बौद्धधर्म, बौद्ध धर्माची तत्त्वे आणि एकूणच धर्मप्रसाराचे कार्य, महामात्र यांची नेमणूक या सर्व घटनांचा उल्लेख हा शिलालेखात आलेला आहे. सम्राट अशोक हे या काळातील अखंड भारताचे पहिले चक्रवर्ती राजा होय. सम्राट याचा अर्थ ज्याचा रथ घोडा चारही दिशांना कुणीही अडवू शकत नाही असा पराक्रमी शासक व विजेता होय.

कलिंगचे युद्ध ही इतिहासातील एक अतिशय वेगळी घटना समजली जाते. बौद्ध धर्माचा जगभर झालेल्या प्रसारास खूप मोठ्या प्रमाणावर अशोकाने केलेले कार्य जबाबदार होते असे इतिहासकार मानतात. अशोकाने पाटलीपुत्र येथे बौद्ध धर्माची तिसरी परिषद बोलावली होती, बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले. अग्नेय अशिया आणि मध्य आशिया येथील देशांमध्ये त्याने धर्मप्रसारासाठी बौद्ध भिक्खू पाठवले होते त्याने अनेक स्तूप आणि विहार बांधले. त्याचप्रमाणे अशोकाने अनेक सोई निर्माण करण्यावर भर दिला उदाहरणार्थ माणसांना तसेच पशूंना मोफत औषध उपचार मिळावे, याची त्यांनी सोय केली होती अनेक नवे रस्ते बांधले, प्रवासामध्ये लोकांना सावली मिळावी यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे लावली, नव्या धर्मशाळा बांधल्या, विहिरी खोदल्या, अशा प्रकारे त्याने अनेक लोकोपयोगी आणि कल्याणकारी कार्य केलं होतं. त्याचप्रमाणे बौद्ध धर्माचा मोठा प्रसार आणि प्रचार करण्याचे कामही अशोकाने केले.



धम्मचक्र परिवर्तन करणारा अशोक हा प्राचीन भारतातील एक श्रेष्ठ व चक्रवर्ती शासक ठरला आहे इतिहासाला युगानुयुगे त्याची नोंद घ्यावी लागेल मानवी कल्याणासाठी अथक प्रयत्न करणारा प्रजा हीच दक्ष व प्रजा कल्याणकारी शासक म्हणून अनेक इतिहासकारांनी अशोकाच्या कार्याचा गौरव केलेला आहे. हा बौध्द सम्राट म्हणून अशोकाचा असा विश्वास होता की, बौध्द धर्म ह सर्व मानव तसेच प्राणी व वनस्पतीसाठी फायदेशीर आहे म्हणून त्यांनी अनेक स्तूप, सांघाराम, विहार, चैत्य आणि दक्षिण आशियातील बौध्द भिक्कुंचे विहार, मठ बांधले. अशोकवादानुसार त्यांनी बुध्दांच्या अवशेषांवर ८४ हजार स्तुप बांधण्यास आज्ञा दिली आणि ते तयार झालेत, याला इतिहास साक्षीदार आहे. ही काहीशी अतिशयोक्ति असली तरी भारतात बऱ्याच ठिकाणी सम्राट अशोकाच्या कालखंडात स्तुप उभारले गेलेत, हे ऐतिहासिक सत्य आहे. त्यांच्या कार्याचा पुरावा ९० च्या दशकात सन्नतीच्या बौध्द स्थळाचा शोध. जे स्थळ कर्नाटकातील कलबुर्गी जिल्ह्यात भीमा नदीच्या काठावर. या स्थळाच्या पुनरुज्जीवनाचे काम सध्या हाती घेण्यात आले आहे.

अशोकानंतर राज्याला योग्य उत्तराधिकारी न लाभल्यामुळे मौर्य साम्राज्याचा ऱ्हास घडून आला विशाल आणि एकछत्री केंद्रीकृत राज्य उभारण्याचा प्रयत्न अखिल भारतीय स्तरावर सर्वप्रथम मौर्य सम्राट यांनी केला यामध्ये चंद्रगुप्त आणि सम्राट अशोक यांची कार्य खूप महत्त्वपूर्ण राहिलेली आहे अशोकाने बौद्ध धर्माची शिकवण देताना लोककल्याणकारी राज्याच्या निर्मितीला चालना दिली शांततेच्या मार्गाने कुठलेही राज्य जास्त काळ टिकू शकेल यावर त्याचा विश्वास निर्माण झाला बौद्ध धर्माच्या प्रसाराला त्याने चालना दिले त्यासाठी शासकीय अधिकारी नेमले स्वतःच्या मुलांना त्याने धर्म प्रसारासाठी पाठवले धम्मचक्र परिवर्तन करणारा अशोक हा प्राचीन भारतातील एक श्रेष्ठ व चक्रवर्ती शासक ठरला आहे इतिहासाला युगानुयुगे त्याची नोंद घ्यावी लागेल मानवी कल्याणासाठी पथक प्रयत्न करणारा प्रजा हीच दक्ष व प्रजा कल्याणकारी शासक म्हणून अनेक इतिहासकारांनी अशोकाच्या कार्याचा गौरव केलेला आहे.

माधव कोंडविलकर आपले पुस्तक 'देवांचा प्रिय राजा प्रियदर्शी सम्राट अशोक' मध्ये म्हणतात की, ''काही बाबतीत चक्रवर्ती सम्राट अशोकांची तुलना, अलेक्झांडर द ग्रेट, ऑगस्टस सीझर, चंगीजखान, तैमूर, रशियाचा पहिला पीटर किंवा पहिला नेपोलियन यांच्याशी केली जाऊ शकते; पण अलेक्झांडरसारखा सम्राट अशोक अति–महत्त्वाकांक्षी नव्हता. ऑगस्टस सीझरसारखा तो एक आदर्श शासनकर्ता होता; पण आपण हुकूमशहा म्हणून ओळखलं जावं असं जे सीझरला वाटायचं तसं अशोकाला कधीच वाटलं नाही. आपली तशी ओळख व्हावी अशी त्याची कधीच इच्छा नव्हती. अशोक एक सामर्थ्यवान सेनापती होता; पण आपल्या पराक्रमाबद्दल, विजयाबद्दल पहिला नेपोलियन जसा सदैव असंतुष्ट असायचा तसं अशोकाचा बाबतीत नव्हतं. प्रजाजनांनी आपल्यावर प्रेम करावं, असं त्याला मनापासून वाटत असे. मनाचा मोठेपणा किंवा उमदेपणा, मनातला शुद्ध भाव, स्वभावातला प्रामाणिकपणा, स्वतःच्या प्रतिष्ठेबद्दलची किंवा मानमरादा बद्दलच्या स्पष्ट स्वच्छ कल्पना आणि मनातलं सर्वांबद्दलचं प्रेम या अशोकाच्या इतरांपेक्षा वेगळेपणाने जाणवणाऱ्या वैशिष्ट्यांमुळे त्याला गौतम बुद्धांच्या किंवा येशू ख्रिस्ताच्या पंक्तीत नेऊन बसवले होते.''

अशोकच्या यशाने त्याच्या भावांचा दुस्वास अजून वाढला, घरातील वाढत्या अशांततेमुळे व सुसीमने बिंदुसारला अशोकाविरुद्ध भडकावले, या वादातून तात्पुरता मार्ग म्हणून बिंदुसारने अशोकला काही काळ अज्ञातवासात जाण्याचा सल्ला दिला, तो त्याने पाळला. या काळात अशोकने कलिंगमध्ये जाउन वास्तव्य केले. या काळात त्याची कौरवाकी या कोळी मुलीशी ओळख झाली. ती नंतर अशोकची दुसरी अथवा तिसरी पत्नी बनली. अशोकच्या काही कोरीवकामांवर तिचे उल्लेख आहेत. मध्यंतरीच्या काळात उज्जैन मध्ये हिंसक उठाव झाला, बिंदुसारने अशोकला अज्ञातवासातून बाहेर येऊन हा उठाव शमवण्यास सांगितले. अशोक उज्जैनला गेला व एका लढाईत घायाळ झाला. त्या काळात असे मानतात की सुसीमद्वारे अशोकवर अनेक हिंसक हल्ले झाले, जे परतावून लावण्यात आले. अशोकची शुश्रूषा करण्यासाठी बौद्धधर्मी परिचारकांची नेमणूक करण्यात आली होती. यातील एक परिचारिका देवी हिच्याशी अशोकचा विवाह झाला. देवी ही विदिशा येथील एका व्यापाऱ्याची मुलगी होती. ती बौद्धधर्मी असल्याने बिंदुसाराला हा विवाह पसंत पडला नाही. त्याने अशोकला पाटलीपुत्रमध्ये रहाण्यास मनाई केली व अशोकला उज्जैन येथील प्रमुख करून टाकले.

अशोकाने आपल्या कारकिर्दीत राज्यात अनेक रुग्णालये व महामार्गाचे जाळे निर्माण केले, रस्त्यांच्या कडेला वृक्षांची लागवड ही अशोकाचीच कल्पना आहे, असे मानतात. आपण सम्राट असल्याच्या अधिकाराचा फायदा त्याने समाजोपयोगी कार्यासाठी केला. त्यानंतर अशोकाला धम्मअशोक असे म्हणू लागले. अशोकाने धम्माची प्रमुख आचारतत्त्वे विशद केली, अहिंसा, सर्व जातिधर्मांबद्दल सहिष्णुता, वडिलधाऱ्या माणसांना मान देणे, संतांना, शिक्षकांना योग्य तो मान देणे, दासांना माणुसकीने वागवणे. अशा आचारतत्त्वांना जगात कोणताही समाज नाकारू शकणार नाही. अशोकाच्या इतिहासकारांनुसार त्याने कलिंगाच्या युद्धानंतर कोणतेही प्रमुख युद्ध छेडले नाही परंतु त्याला शेजारी राष्ट्रांशी ग्रीक राज्ये, चोल साम्राज्य याच्याशी त्याला नेहमी युद्धाची शक्यता वाटत होती. परंतु अशोकाने पूर्वायुष्यातील केलेल्या मोहिमांमुळे व मगधच्या सामर्थ्यामुळे अशोकने बौद्ध धर्म स्वीकारला तरी त्याच्या शेजारी राज्यांनी त्याला छेडण्याचे साहस केले नाही. तसेच बौद्ध धर्म स्वीकारला, अहिंसा हे राष्ट्रीय धोरण बनवले तरी मगधाचे सैनिकी सामर्थ्य अबाधित ठेवले. अशोकाला ग्रीक जगताची माहिती होती असे कळते. तसेच चंद्रगुप्त मौर्याने केलेल्या ग्रीकांविरुद्धच्या मोहिमांमुळे मौर्य साम्राज्याची कीर्ती ग्रीस, इजिप्तपर्यंत पोहोचली होती असे कळते.

अवघ्या जगाने गौरवलेला सम्राट अशोक मात्र दुर्दैवाने काही काळ भारताच्या विस्मृतीत गेला, ती स्मृती जागविण्याची भारताला आज अत्यंत गरज आहे. कारण हा देशच अशोकाचा आहे, हे विसरुन चालणार नाही.

---------

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# सकाळी उठल्यानंतर २ लिटरपेक्षा जास्त पाणी प्यायल्यास किडनीवर येतो दाब! जाणून घ्या नियमित किती ग्लास पाणी प्यावे



निरोगी आरोग्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. पाण्याचे सेवन केल्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. पाण्याच्या सेवनामुळे शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात आणि पोट स्वच्छ होते. पाण्याचा सर्वच गोष्टींसाठी केला जातो. याशिवाय अनेकांना सकाळी उठल्यानंतर नियमित उपाशी पोटी पाणी पिण्याची सवय असते. उपाशी पोटी पाण्याचे सेवन केल्यामुळे शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात आणि शरीर डिटॉक्स होते. पाण्याच्या सेवनामुळे किडनी आणि लिव्हरचे कार्य सुरळीत चालू राहते. किडनी डिटॉक्स करण्यासाठी पाण्यासह नारळ पाणी आणि इतर पेयांचे सेवन करावे. पण सकाळी उठल्यानंतर जास्त पाणी प्यायल्यामुळे किडनीवर दाब येतो, असे अनेकांना वाटते.

किडनीचे कार्य सुरळीत ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्यावे. पाण्याचे सेवन केल्यामुळे शरीरात साचलेले विषारी घटक लघवी आणि घामावाटे निघून जातात. त्यामुळे दिवसभरात ७ ते ८ ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे. मूत्रपिंड निरोगी ठेवण्यासाठी पाणी पिणे आवश्यक आहे. पण सकाळी उठल्यानंतर गरजेपेक्षा जास्त पाणी पिणे मूत्रपिंडासाठी धोकादायक ठरू शकते. अनेक लोक सकाळी उठल्यानंतर २ लिटर पेक्षा जास्त पाण्याचे सेवन करतात. पण अतिपाण्याचे सेवन केल्यामुळे किडनीवर दाब निर्माण होतो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला नियमित किती पाण्याचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

नियमित किती पाण्याचे सेवन करावे?

डॉ. संजीव सक्सेना (पीएसआरआयचे नेफ्रोलॉजी प्रमुख) यांनी सांगितल्यानुसार, दैनंदिन आहारात जास्त पाण्याचे सेवन करणे आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. पाण्याच्या अतिसेवनामुळे शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे शरीराला आवश्यक असलेल्या प्रमाणातच पाण्याचे सेवन करावे. जास्त पाण्याचे सेवन केल्यास मूत्रपिंडावर दाब येतो आणि शरीराचे कार्य बिघडते. मात्र निरोगी आरोग्यासाठी तुम्ही सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी १ किंवा २ ग्लास पाण्याचे सेवन करू शकता. या पाण्याच्या सेवनामुळे शरीरात साचलेले विषारी घटक बाहेर पडून जातील. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर अतिपाण्याचे सेवन करू नये.

किडनीच्या निरोगी आरोग्यासाठी नियमित किती पाणी प्यावे?

किडनी शरीरातील रक्त शुद्ध करण्याचे काम करते. याशिवाय किडनीमध्ये साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्याचे काम किडनी करते. त्यामुळे तुम्ही दिवसभरात ३ लिटर पाणी पिऊ शकता. तासनतास ऑफिसमध्ये बसून काम करणाऱ्या व्यक्तींनी स्वतःच्या आरोग्याची जास्त काळजी घ्यावी. कारण भरपूर पाण्याचे सेवन केल्यास सतत लघवीला जावे लागेल. एसीमध्ये बसून काम करणाऱ्या लोकांनी ३ लिटर पाण्याचे सेवन करावे.

# पुस्तकं वाचनाची सवय विद्यार्थ्यांमध्ये सर्वोत्तम संस्कार आणि विचार रूजविते :- प्रा.राजेश पाटिल ताले

## विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रम,वडोदा ता.मलकापूर

मलकापूर :- पीएम श्री भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा वडोदा ता. मलकापूर जि.बुलडाणा येथे पीएम योजनेअंतर्गत विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाकरिता प्रमुख मार्गदर्शक म्हणून जेसीआय इंटरनॅशनल द्वारा आऊटस्टँडिंग यंग पर्सन ऑफ द इंडिया अवॉर्ड:-२०२४ चे विजेते,राष्ट्रीय व्याख्याते,स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायझेशन चे अध्यक्ष प्रा.राजेश पाटिल ताले उपस्थित होते.चला देश घडवूया या विषयावर विद्यार्थ्यांसोबत आणि शिक्षकांसोबत संवाद साधतांना आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात गुगल पूर्ण जगाचा रस्ता दाखवू शकतो पण माणूस बनण्याचा रस्ता फक्त संस्कार आणि शिक्षणच दाखवू शकतात. गुगल,इंटरनेट हे माहिती मिळविण्याच साधन आहे, ज्ञान मिळवायचं असेल तर पुस्तकेच वाचावी लागतात. त्याकरिता पालकांनी आणि शिक्षकांनी शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी तसेच मुलांमधील सुप्त गुणांना वाव देऊन मुलांचे व्यक्तिमत्व विकसित करावे असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा.राजेश पाटिल ताले यांनी





सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष हरिदास गायकवाड, शाळेचे मुख्याध्यापक देविदास नाफडे,बेलाड चे केंद्रप्रमुख अनिल खर्चे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळा वडोदा ने मुख्यमंत्री सुंदर शाळा अभियानात प्राथमिक विभागात बुलडाणा जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे तसेच पीएम श्री या केंद्र सरकारच्या उपक्रमाअंतर्गत शाळा राज्यस्तरावर नेण्याचा शाळा व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांचा मनोदय आहे असे मुख्याध्यापक देविदास नाफडे यांनी सांगितले.

### आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते लातूर ग्रामीण मतदार संघातील ५१ अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना नियुक्ती पत्राचे वाटप



लातूर :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प विभागाच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील निवड झालेल्या ५२ अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

लातूर ग्रामीण मतदार संघात रिक्त असलेल्या ८४ अंगणवाडी सेविका मदतनीस जागेची प्रक्रिया झाली त्यातील निवड प्रक्रिया पूर्ण केलेल्या ५२ पात्र महिलांना लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते लातूर पंचायत समिती सभागृहात शुक्रवारी आयोजित एका कार्यक्रमात नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके, रेणापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुरेश जाधव यांच्यासह भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, पंचायत राज समितीचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा भाजपाचे महेंद्र गोडभरले, सतीश आंबेकर, तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, दशरथ सरवदे, सांगायचे लातूर तालुका अध्यक्ष वैभव सापसोड, रेणापूर तालुका अध्यक्ष वसंत करमुडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वातील राज्यातील महायुती शासनाने राज्यात आणि जिल्ह्यात अनेक सर्वांगीण विकासाच्या नवनवीन योजना सुरू केल्या त्याचा लाभ देण्याचे काम सर्वत्र मोठ्या प्रमाणात होत आहे असे सांगून यावेळी बोलताना आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, अंगणवाडी सेविका मदतनीस यांची अत्यंत पारदर्शक निवड प्रक्रिया पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना आज नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले. गावचा विकास अंगणवाडीच्या मदतीस आणि सेविका यांच्यावर अवलंबून आहे तेव्हा त्यांनी शासनाच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी प्रयत्न करून गरजूंना न्याय देण्याचे काम करावे असे सांगून निवड झालेल्या सर्व अंगणवाडी मदतनीस व सेविका यांना शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख यांनी राज्य शासनाच्या १०० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत जिल्हाभरात अंगणवाडी मदतनीस व सेविका यांची निवड प्रक्रिया पूर्ण होत असल्याची माहिती प्रास्ताविकातून दिली. यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके आणि सुरेश जाधव यांनी सत्कार करून स्वागत केले तर या प्रसंगी लातूर तालुका सरपंच संघटनेच्या वतीने आ कराड यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षक अर्चना पुरी यांनी केले.

यावेळी कार्यक्रमास सुरज शिंदे,भैरवनाथ पिसाळ, प्रताप पाटील, शरद दरेकर, संभाजी वायाळ, मारुती शिंदे, पद्माकर चिंचोलकर, भाऊसाहेब गोळबिले, अशोक सावंत, हनुमंत गव्हाणे, रुपेश काळे, पांडुरंग बलवाड, अमर गायकवाड, दत्ता सरवदे, गोपाळ पाटील आदिनाथ मुळे, नारायण राठोड यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी अंगणवाडी सेविका मदतनीस अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अर्जुन अर्बन को-ऑप. सो. लि. केज बँकेच्या अध्यक्षपदी संदीप भैया इंगळे यांची तर उपाध्यक्षपदी सोनवाणे रामदासअंबादास बिनविरोध निवड




केज/प्रतिनीधी केज तालुक्यात आल्पवधित नावलौकिक मिळविलेली अर्जुन अर्बन को-ऑपरेटिव सोसायटी लिमिटेड केज बँकेच्या अध्यक्षपदी संदीप (भैया) इंगळे यांची तर उपाध्यक्षपदी सोनवाणे रामदास अंबादास बिनविरोध निवड करण्यात आली,या बाबद सविस्तर माहिती अशी की केज शहरात अर्जुन को - ऑप. सोसायटी लि.ची सर्व साधारण सभा संपन्न झाली यामध्ये अर्जुन अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड केज बँकेच्या अध्यक्षपदी संदीप (भैया) इंगळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### अर्धवट कामामुळे वानधारकासह नागरिना धुळी आणि खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागते वंचितचे नेते सुरेश जाधव यांनी सर्वपक्षीय आंदोलनाचा ईशारा दिला,

**अधिकारी व गुत्तेदार यांच्या हलगर्जीपणामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला विलंब होत आहे याचा नाहक त्रास वाहनधारक व सर्वसामान्य नागरिकांना सोसावा लागत आहे. जनभावना लक्षात घेता राष्ट्रीय महामार्ग विभागाने किनवट शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते अशोक स्तंभापर्यन्तच्या महामार्गाचे काम तातडीने आणि दर्जेदार पद्धतीने केले नाही तर सर्वपक्षीय जनआंदोलन केले जाईल असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे नेते सुरेश जाधव यांनी पत्रकारांशी बोलताना दिला आहे.**

किनवट: शेख शौकत :-किनवट शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते अशोक स्तंभापर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गाच्या अर्धवट कामाबद्दल वंचित बहुजन आघाडीचे नेते सुरेश जाधव यांनी जीवघेण्या खड्ड्याचे चित्रीकरण करून सर्वपक्षीय आंदोलन करण्याचा इशारा देताच खडबडून जागे झालेल्या गुत्तेदाराने दुसऱ्या दिवशी रस्त्यावर गिट्टी टाकून सुरुवात केली आहे. रस्त्याचे पुढील काम सुरू झाल्यामुळे वाहनधारक व नागरिकांनातुन समाधान व्यक्त होत आहे. मागील पाच ते सहा वर्षांपासून किनवट शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१चे काम संथ गतीने सुरू आहे. बहुतांश ठिकाणच्या अर्धवट कामामुळे वानधारकासह नागरिना धुळीसह जीवघेण्या खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. वेगवेगळ्या राजकीय




पक्षाकडून आणि सामाजिक संघटनाकडून या महामार्गाच्या कामाविरोधात सातत्याने तक्रारी होत असतानाही त्याची दखल घेतली जात नाही.नागरिकांच्या सततच्या रेट्यामुळे महिन्याभरापूर्वी किनवट शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते अशोक स्तंभापर्यंतच्या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले. गुत्तेदाराने या रस्त्याचे खोदकाम केले परंतू पुढील काम रखडून ठेवले. या रस्त्यावर वाहनधारकांना जीवघेणी कसरत करावी लागत असतानाही कोणी आवाज उठवायला तयार नाही दरम्यान वंचित बहुजन आघाडीचे नेते सुरेश जाधव यांनी अर्धवट व खोदून ठेवलेल्या रस्त्याचे चित्रीकरण करून सर्वपक्षीय आंदोलन करण्याचा इशारा दिला या इशाऱ्यानंतर गुत्तेदाराला जाग आली आणि दुसऱ्या दिवशी या रस्त्यावर गिट्टी टाकून पूर्ववत काम सुरु झाल्याने वाहनधारक व नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

## जागृतीचा अग्नी प्रज्वलित ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू केला आहे. बी. बी. मेश्राम.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १०१ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे आपले हक्क प्रस्थापित करण्याकरिता चढाईचे धोरण स्विकारल्याशिवाय गत्यंतर नाही. करिता जागृतीचा अग्नी कधीही विझू देऊ नका. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दोन्ही विधानाच्या ९६ व्या व ९४ व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर १०१ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा ३० मार्च २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, समाज जीवनात एस. सी., एस. टी., ओबीसी या संवैधानिक समूहांना प्रतिनिधित्व बहाल करताना योग्य प्रतिनिधी उपलब्ध नसल्यास उपलब्ध असणाऱ्यांना प्रशिक्षित करून सक्षम बनविणे, हे व्यवस्थापनाचे काम आहे. समाजाच्या समस्या निर्मूलनासाठी समाजाला नेमकेपणाने काय आजार आहे? याचे निदान करून उपाय योजनांची अंमलबजावणी केली पाहिजे. बुद्ध गया येथील महाबोधी महाविहाराच्या मागील भागात ज्या पिंपळ वृक्षाखाली तथागतांना बोधी प्राप्त झाली होती, ते महाकाय पिंपळ वृक्ष अस्तित्वात आहे. त्या वृक्षाची गळणारी पाने गोळा करण्यात अनुयायी धन्यता मानतात. मात्र बुद्धाचे विचार गोळा करून आचरण करण्याचे अनुषंगाने अनास्था पहायला मिळत आहे. तर मग बुद्धाचे विचारांचा चिकित्सक समाज कसा तैयार होईल? ज्यामुळे पुतळ्याला माल्यार्पण करून विचारांना टाळे लावणारा समाज निर्माण होत आहे.

२३ मार्च १९२९ ला बेळगांव येथे जिल्हास्तरीय बहिष्कृत वर्गाची सामाजिक परिषद भरविण्यात आली होती. ज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले हक्क प्रस्थापित करण्याकरिता चढाईचे धोरण स्विकारल्याशिवाय गत्यंतर नाही.' तर १९ मार्च १९२७ ला कुलाबा जिल्ह्यांतील बहिष्कृत परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जागृतीचा अग्नी कधीही विझू देऊ नका.' असा संदेश दिला होता. या परिषदेचे संभाजी तुकाराम गायकवाड हे स्वागताध्यक्ष होते. ज्यांनी त्या काळात अस्पृश्यांच्या समस्या निर्मूलनासाठी कृती कार्यक्रम ठरविण्यासाठी कार्यकर्त्यांना एकत्रित बसता यावे म्हणून जनसंपर्क कार्यालय चालविले होते. ही ऐतिहासिक बाब लक्षात घेऊन आपण चळवळीच्या कार्याला वेगाने गतिमान करण्यासाठी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय निर्माण करून त्यात सातत्याने साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी म्हणजे रविवारी व इतर सुविधा जनक वेळेला कालानुरूप विविध विषयांवर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करून जागृतीचा अग्नी प्रज्वलित ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू केला आहे. २० महिन्यात १०० कार्यशाळांची अंमलबजावणी केली आहे. संधीचे सोने व्हावे म्हणून आपण सदरील प्रासंगिक विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे.



उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्त्या दिक्षा खरात म्हणाल्या की, बेळगाव येथे १९२९ ला संपन्न झालेल्या बहिष्कृत सामाजिक परिषदेत कुणालाही अस्पृश्य म्हणणे गुन्हा समजला जावा, जातीचे दाखले बंधनकारक नसावे, १६ वर्षे मुलींना व १८ वर्षे मुलांना लग्नासाठी वय बंधनकारक करावे. समारंभात जेवनाव्यतिरिक्त खर्च टाळायला हवा. असे ठराव पास करण्यात आले होते. याचे भान ठेवून वर्तमानकाळात मार्गक्रमण करावे.

प्रमुख वक्ते उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, त्यांनी बुद्धीष्ट इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चरर्स एंड ट्रेडर्स असोसिएशन (बिमाटा) च्या वतीने छत्रपती संभाजी नगर विमानतळावर स्वबळावर बुद्ध शिल्पाला साकारण्यात आले आहे. यात अनेकांनी कामात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. या प्रक्रियेत सत्तेतील मंत्री महोदय व इतर सहभागी असल्याने ते अडथळे दूर झालेत. तेव्हा सत्तेतील शक्तीचे महत्त्व कळाले.

याप्रसंगी एड. राहूल चेंबळे म्हणाले की, सध्याची परिस्थिती आणि विषय यात समन्वय दिसत आहे. आपल्या हक्कांसाठी आवाज उठविला नाही तर इतर जण या संधीचा दुरुपयोग करतील. आपण राजकारणात भाग घेतला नाही तर आपल्या पेक्षा कमी शिकलेले लोक ती उणीव भरून काढतील. एड. राजू बागूल म्हणाले की, सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून धोरण आखले पाहिजेत. जेणेकरून त्यांना कायदेशीर, संवैधानिक, नैसर्गिक, व इतर मूलभूत हक्काचे उपभोग घेता येईल. अमित खिल्लारे म्हणाले की, सर्व शक्तीचा वापर करून महाबोधी महाविहार ब्राह्मणाच्या तावडीतून मुक्त केले पाहिजे. प्रतीक पंचशील म्हणाले की, समाजव्यवस्थेचे संचालक निवडणूकीच्या माध्यमातून व्यवस्थेत अबाधित राहणासाठी प्रयत्न करीत असतात. जी. एस. दोडवे यांनी इच्छा असेल तिथे मार्ग काढता येतो, अन्यथा लोक बहाणे सांगत असतात. या कांशीराम जी च्या विधानाची आठवण करून दिली. आपण समाजाचे देणे लागतो. चोरून घेणारे, मागून देणार नाहीत तरी ते हिसकावून घ्यावे लागतील. वैचारीक ज्ञान वाटत राहिले पाहिजे. अस्मिता खरात म्हणाल्या की, शिक्षणामुळे प्रेरणा मिळते. महादेव डांबरे म्हणाले की, जयंती नाचून नव्हे! तर वाचून साजरी केली पाहिजे. जयभीम चा अर्थ आणि ताकद समजून घेतली पाहिजे. सोहेल पटेल म्हणाले की, जी. एस. दोडवे यांनी 'जेतवन' नावांचा बंगला छत्रपती नगरात बांधला हे प्रेरणादायी आहे. हक्क प्रस्थापित करण्यासाठी लढ्याला साथ दिली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती सणाप्रमाणे साजरी केली पाहिजे. विलास कट्यारे म्हणाले की, आपल्या उणीवा तपासून कृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. शत्रू पक्षाचे लोक दिवसरात्र कार्यरत आहेत तर आपण कुठे आहोत? पंगत कुणाचीही असो, वाढणारा आपला असावा. सुभाष जाधव म्हणाले वर्तमानात निर्माण झालेली अनास्था दूर करण्यासाठी आपण कार्य केले पाहिजे.

प्रास्ताविक करताना एड. विलास रामटेके म्हणाले की, भारताचे संविधानानुसार कार्य होत नसल्याने आपणांस चर्चा करावी लागत आहे. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे, आभार मिलिंद बागूल यांनी व्यक्त केले. यावेळी टी. एन. थोरात यांनी 'भीमा नशिबी तुझ्या, हे विचारू कुणा? चौदावे रत्न आणि तारीख चौदाच का?' हे गीत सादर केले. या कार्यशाळेला प्रतीक पंचशील, उद्योजक मिलिंद बागूल, सुभाष जाधव, राहुल मेश्राम, महादेव डांबरे, सिद्धार्थ घोडके, टी. एन. थोरात, एड. राजू बागूल, सोहेल पटेल, दिक्षा खरात, जी. एस. दोडवे, प्राचार्य विलास कट्यारे, अमित खिल्लारे, एड. राहुल चेंबळे, अस्मिता खरात, पंचशीला खरात, बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात विद्यापीठिय उन्हाळी पदवी परीक्षा २०२५ सुरळीत सुरू पदवी परीक्षार्थी आणि पालकांचा पुष्पहार आणि गुलाब पुष्प देऊन केला सन्मान

लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (केंद्र क्रमांक ३०४), लातूर येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत विद्यापीठिय उन्हाळी पदवी परीक्षा २०२५ दि. ०२ एप्रिल २०२५ पासून सुरळीतपणे सुरू झाली आहे. ही परीक्षा दि. ०२ एप्रिल २०२५ ते ०९ मे २०२५ पर्यंत सुरू राहणार असून सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रामध्ये बी. ए., बि. कॉम. आणि बीएस्सी. (एन.इ.पी.) शाखेतील एकूण ९००० विद्यार्थी परीक्षा देत आहे. या परीक्षेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे यांचे मौलिक मार्गदर्शन मिळत असून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई यांच्या.ा मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरू आहे. केंद्र प्रमुख म्हणून प्रा. रमेश तडवी, सहाय्यक केंद्र प्रमुख म्हणून मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला आणि तांत्रिक सहाय्यक म्हणून डॉ. धोंडिबा भुरे कार्य करीत असून कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, महादेव कोरे, राम पाटील, संतोष येंचेवाड,




योगिराज माकणे आणि संदीप मोरे यांचे सहकार्य मिळत आहे. या परीक्षेसाठी सह केंद्रप्रमुख म्हणून डॉ. आर.एन.जाधव (शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ) काम पाहणार आहेत पदवी परीक्षेच्या प्रारंभ दिनी परीक्षार्थी आणि पालकांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी पुष्पहार आणि गुलाब पुष्प देऊन महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सन्मान करून परीक्षेसाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या यावेळी स्टाफ सचिव डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. यशवंत वळवी, प्रा. व्यंकट दुडिले, प्रा. श्रीकांत माळी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. या परीक्षेच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE